माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /३६९३/२०२१/कोल्हापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| अतुल महादेव पाटील | ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत तळगाव, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर | विस्तार अधिकारी (पं.) पंचायत समिती राधानगरी, जि. कोल्हापूर |

<u>द्वितीय अपील सुनावणी दिनांक- १४.१२.२०२३</u>

अपिलार्थी यांनी दि. ३०.०८.२०२१ रोजी राज्य माहिती आयुक्त,खंडपीठ पुणे यांचे कडे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. अर्जदाराने द्वितीय अपिल दाखल करताना 'माहिती दिली नाही' असे प्रयोजन नमूद केले.

आयोजित सुनावणीस अपिलार्थी हजर आहेत. विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

१. अपिलार्थीचा माहिती अर्ज दिनांक १६.०४.२०२१ रोजीचा आहे. त्यानुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत तळगाव, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर यांनी माहिती अर्जावर केलेल्या कार्यवाहीचे कोणतेही अभिलेख आयोगास सादर केली नाही.
२. अपिलार्थीचे प्रथम अपिल दि. ०२.०६.२०२१ रोजीचे असुन त्यावर तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.) पंचायत समिती राधानगरी, जि. कोल्हापूर यांनी अपिल अर्जावर केलेल्या कार्यवाहीचे कोणतेही अभिलेख आयोगास सादर केली नाही.
३. सुनावणीचेवेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. मोहन गणपती गुरव हे होते. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही. तत्कालीन प्रथम अपिलीय श्री. आर्यन साबळे हे होते.
४. आयोगाकडील उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जात ग्रामपंचायत तळगांव मधिल स्वच्छता व हागणदारिमुक्त गांव याबाबत मुद्देनिहाय माहितीची मागणी केली आहे.

५. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत तळगाव, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर, श्री. मोहन गणपती गुरव यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर काहीही कार्यवाही केली नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने ते दंडात्मक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

६. तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.) पंचायत समिती राधानगरी, जि. कोल्हापूर यांनी प्रथम अपील आदेश पारीत केला नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम १९(६) चा भंग केलेला असल्याने ते शिस्तभंग विषयक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८)(क)(२) नुसार विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती राधानगरी, जि. कोल्हापूर यांना याप्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली सर्व माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध होत नाही, त्याबाबतचे स्पष्ट कारण नमुद करुन अपिलार्थीस लेखी कळवावे.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत तळगाव, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर यांनी माहिती अर्जावर काहीही कार्यवाही केलेली नाही, त्यामुळे अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असलेने त्यांचेविरूध्द अधिनियमाच्या कलम २०(१)नुसार कारवाई का करणेत येवू नये? याबाबतचा खुलासा आयोग आदेश प्राप्ती पासून एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा, अन्यथा आयोगाच्या आदेशाच्या उल्लंघनाची कृती दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी वरील आदेशाची विहीत कालावधीत अंमलबजावणी होईल याबाबतची दक्षता घ्यावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.) यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही, आदेश पारीत केला नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम-१९(६) तसेच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/११८२/प्र.क्र.६५/ ०७/६(मा.अ) दि.१२/१२/२००७ व परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ दि.३१/३/२००८ मधील तरतुदींचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांना आदेशित करण्यात येते की, यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५)/सहा, दि.०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र. क्र. (२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

या निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( समीर सहाय )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ पुणे.**

<u>प्रतिलिपी- माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाही साठी अग्रेषित-</u>
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर